प्रबोधन
गोरेगाव

# अठरावा वार्षिक अहवाल

१९९० – ९१

# प्रबोधन क्रीडाभवन

सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४.

## १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची १८वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ११ जानेवरी १९९२ रोजी रात्री ९ वाजता, प्रबोधन क्रीडाभवन,सिद्धार्थ नगर,.गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. प्रास्ताविक

२. सन १९८९–९० सालच्या वार्षिक सभेचे इतिवृत वाचन व त्यास मंजूरी देणे.

३. १९९०–९१ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

४. नवीन वर्षाकरिता (१९९१–९२) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन
**गिरीश देसाई**
कार्याध्यक्ष
**डॉ. मनोहर अदवानकर**
प्रमुख कार्यवाह

गोरेगाव, मुंबई – १०४

---

१) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थनगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४. येथील संस्थेच्या कार्यालयात दि. ६–१–१९९२ व ७–१–१९९२ पर्यंत रोज रात्री ६ ते ७ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक ९–१–९२, पूर्वी कार्याध्याक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. ७–१–९२ पुर्वी संस्था कार्यालयात संध्या. ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

# प्रबोधन क्रीडाभवन

सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४.

## १८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची १८वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक ११ जानेवरी १९९२ रोजी रात्री ९ वाजता, प्रबोधन क्रीडाभवन,सिद्धार्थ नगर,.गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. प्रास्ताविक

२. सन १९८९–९० सालच्या वार्षिक सभेचे इतिवृत वाचन व त्यास मंजूरी देणे.

३. १९९०–९१ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद (हिशेब तपासनीसांच्या अहवालासह) वाचून मंजूर करणे.

४. नवीन वर्षाकरिता (१९९१–९२) घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे. (एकूण ६ जागा)

५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीस व सरकारमान्य हिशेब तपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

कार्यकारी मंडळाच्या आज्ञेवरुन

**गिरीश देसाई**

कार्याध्यक्ष

गोरेगाव, मुंबई – १०४

**डॉ. मनोहर अदवानकर**

प्रमुख कार्यवाह

---

१) संस्थेचा जमाखर्च सभासदांच्या अवलोकनार्थ प्रबोधन क्रीडाभवन, सिद्धार्थनगर, गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. ६–१–१९९२ व ७–१–१९९२ पर्यंत रोज रात्री ६ ते ७ पर्यंत ठेवण्यात येईल.

२) कोणाही सभासदास त्या बाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दिनांक ९–१–९२, पूर्वी कार्याध्याक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

३) गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

४) निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. ७–१–९२ पुर्वी संस्था कार्यालयात संध्या. ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमूना याच ठिकाणी उपलब्ध आहे.

फारमोठी जबाबदारी 'प्रबोधन'वर पडली आहे. त्यासाठी 'प्रबोधन'ला कार्यकर्त्यांचे फार मोठे पाठबळ तर आहेच पण त्याचबरोबर आर्थिक पाठबळाचीही जरुर भासणार आहे. त्यासाठीच या क्रीडासंकुलाचे दीर्घ मुदतीचे सभासदत्व स्विकारून संस्थेवर प्रेम करणाऱ्या सर्वच व्यक्तिंनी संस्थेस आर्थिक पाठबळ उपलब्ध करून द्यावे, असे 'प्रबोधन' या संस्थेस वाटते व तसे आवाहन संस्थेतर्फे करण्यात येत आहे.

### क्रिकेट प्रशिक्षण वर्ग :

'प्रबोधन क्रीडासंकुला'चे बांधकाम जलद गतीने सुरू असतानाच, सिद्धार्थनगर महापालिका क्रीडांगणावर दिनांक १६मे १९९० ते ३० जून १९९० या कालावधीत, श्री. अजित पै यांच्या तज्ञ मार्गदर्शनाखाली क्रिकेटचे प्रशिक्षणवर्ग घेण्यात आले. त्या प्रशिक्षण वर्गासाठी क्रीडांगणावर क्रिकेटची खेळपट्टी तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आली होती व या प्रशिक्षण वर्गाचा लाभ अनेक होतकरू खेळाडूंनी घेतला.

### प्रबोधन वक्तृत्व स्पर्धा : वर्ष १८ वे

शालेय त्याचप्रमाणे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी 'प्रबोधन'ने आपल्या स्थापनेपासूनच वक्तृत्व स्पर्धा भरविण्यास सुरुवात केली. यंदाच्या वर्षीच्या अखिल महाराष्ट्र पातळीवरील या स्पर्धा रविवार दि. २३ सप्टेंबर १९९० रोजी पाटकर महाविद्यालयात शिस्तबद्ध वातावरणात पार पडल्या. दूरदर्शनच्या वाढत्या आक्रमणामुळे या स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या रोडावते आहे, ही या स्पर्धेच्या आयोजनाच्या दृष्टीने चिंतेची बाब आहे. शाळा व महाविद्यालयाच्या चालकांनी व शिक्षकांनी अधिकाधिक विद्यार्थ्यांना या स्पर्धेत भाग घेण्यास प्रवृत्त करून स्पर्धेचे यश द्विगुणित करावे असे संस्थेस वाटते.

स्पर्धेचा निकाल पुढीलप्रमाणे :

#### शालेय गट :

शिक्षणमहर्षी कै. दादासाहेब रेगे स्मृती प्रबोधन फिरते स्मृति चिन्ह :

**सांघिक विजेता संघ :** अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव

#### घोषित विषयांवरील स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : (रोख रू. १५०/–) कु. ज्योती श्रीराम जोशी, अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल
द्वितीय पारितोषिक : (रोख रू. १००/–) कु. अश्विनी आत्माराम तोरणे, अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल.
तृतीय पारितोषिक : (रोख रू. ५०/–), कु. प्राची श्रीकांत पटवर्धन, डॉ. बेडेकर विद्यामंदिर, ठाणे

#### उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : (रोख रू. १००/–), सत्यजित अरविंद वैद्य, नंदादीप विद्यालय, गोरेगाव.
द्वितीय पारितोषिक : (रोख रू. ५०/–), कु. स्वप्ना देशपांडे, टिळक नगर विद्यामंदिर, डोंबिवली.

#### महाविद्यालयीन गट :

कै. जगदिश गोविंदराव कुलकर्णी स्मृति प्रबोधन फिरते स्मृति चिन्ह.
सांघिक विजेतासंघ : आर्. ए. पोद्दार वाणिज्य महाविद्यालय, माटुंगा

#### घोषित विषयांवरील स्पर्धा :

प्रथम पारितोषिक : (रोख रू. २००/–), राहुल गोपाळ गोखले, आर्. ए. पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्स
द्वितीय पारितोषिक : (रोख रू. १५०/–), कु. गौरी पेंडसे, मुंबई विद्यापीठ (इतिहास शाखा)

तृतीय पारितोषिक : (रोख रू. १००/–), कुमारी जयश्री कोर्डे, चेंबूर कॉम्प्रीहेन्सीव्ह कॉलेज ऑफ एज्यु., चेंबूर.

**उत्स्फूर्त भाषण स्पर्धा :**

प्रथम पारितोषिक : (रोख रू. १५०/–), प्रशांत जोशी, आर्. ए. पोद्दार कॉलेज ऑफ कॉमर्स.
द्वितीय पारितोषिक : (रोख रू. १००/–), अभिजित अत्रे, सीमबॉयसीस् सोसायटीज् लॉ कॉलेज, पुणे

या स्पर्धेत शालेय गटाचे परीक्षक प्रा. चौघुले व प्रा. पाटणकर होते, तर महाविद्यालयीन गटाचे परीक्षक श्री. मोरे व सौ. कुलकर्णी हे होते. या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ त्याचदिवशी गोरेगावचे आमदार श्री. सुभाष देसाई यांच्या शुभहस्ते पार पडला. त्याप्रसंगी विजेत्या संघास फिरता करंडक व विजेत्या स्पर्धकांस रोख पारितोषिके व प्रशस्तीपत्रके देऊन गौरविण्यात आले.

**प्रबोधन आंतरशालेय क्रीडामहोत्सव – वर्ष १३ वे**

'प्रबोधन' तर्फे दरवर्षी आयोजिण्यात येणारा आंतरशालेय क्रीडामहोत्सव म्हणजे वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरातील शालेय विद्यार्थी – विद्यार्थिनींसाठी आपले क्रीडानैपुण्य दाखविण्याची एक पर्वणीच. यंदाच्या वर्षीच्या या स्पर्धा ४ ते ६ जानेवारी १९९१ या दरम्यान सिद्धार्थ नगर महानगरपालिका क्रीडांगणावर भरविण्यात आल्या. त्यात वांद्रे ते दहिसर या पश्चिम उपनगरांतील ६० शाळांतील, ३००० हून अधिक मुलामुलींनी भाग घेतला.

या क्रीडामहोत्सवाचे उद्घाटन दि. ४ जानेवारी १९९१ रोजी श्री. श्यामराव अष्टेकर, माननीय क्रीडा राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे शुभहस्ते करण्यात आले, तर श्री. शंकरराव साळवी, संचालक क्रीडा, व युवा संचलनालय, महाराष्ट्र राज्य हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी गतवर्षीची गतवर्षीची सर्वोत्कृष्ट खेळाडू शीलिता डायस, मेरी इम्याक्युलेट गर्लस् हायस्कूल, बोरिवली, हिच्या हस्ते क्रीडाज्योत प्रज्वलित करणात आली.

सतत तीन दिवस चाललेल्या या क्रीडामहोत्सवाचा बक्षिस समारंभ दि. ६ जानेवारी १९९१ रोजी श्री. राजा मसाणे, संचालक, आनंद मोटर्स एांच्या शुभहस्ते पार पडला तर गोरेगावचे आमदार श्री. सुभाष देसाई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी बोलतांना, त्यांनी, ''पुढील वर्षाच्या क्रीडामहोत्सवापूर्वी 'प्रबोधन क्रीडासंकुला'ची उभारणी पूर्ण झालेली असेल'', अशी ग्वाही दिली. विजेत्या संघांस फिरते चषक तर विजेत्या स्पर्धकांस पदके व प्रशस्तीपत्रे देण्यात आली.

**स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे :**

सर्वोत्कृष्ट संघासाठी असलेला 'प्रबोधन फिरता करंडक' – नंदादीप विद्यालय, गोरेगाव.

**कबड्डी (मुले) :**
विजेता संघ : नंदादीप विद्यालय, गोरेगाव
उपविजेता संघ : आर्. व्ही. टेक्निकल हायस्कूल, खार

**कबड्डी (मुली) :**
विजेता संघ : नंदादीप विद्यालय, गोरेगाव
उपविजेता संघ : गोखले हायस्कूल, बोरिवली

**खो – खो (मुले) :**
विजेता संघ : परांजपे विद्यालय, अंधेरी
उपविजेता संघ : आदर्श विद्यालय, गोरेगाव

**खो – खो (मुली) :**
विजेता संघ : परांजपे विद्यालय, अंधेरी
उपविजेता संघ : पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले

**अॅथलेटिक्स् स्पर्धा :**
विजेता संघ : अ.भि. गोरेगावकर इंग्लिश स्कूल, गोरेगाव
उपविजेता संघ : मेरी इम्याक्युलेट गर्लर्स हायस्कूल, बोरिवली

**पारंपारिक मूल्ये :**
विजेता संघ : चिल्ड्रन्स् वेल्फेअर सेंटर, सेकंडरी स्कूल, वर्सोवा
उपविजेता संघ : पार्ले टिळक विद्यालय, इंग्रजी माध्यम, विलेपार्ले

**सांघिक कवायत :**
विजेता संघ : सेन्ट थॉमस् हायस्कूल, गोरेगाव
उपविजेता संघ : विद्यामंदिर, दहिसर

**उत्कृष्ट क्रीडापटू :** कुमारी झीलिता डायस, मेरी इम्याक्युलेट् गर्ल्स हायस्कूल, बोरिवली

## शालांत परीक्षा व्याख्यानमाला (वर्ष १८वे)

'प्रबोधन'ने आपल्या स्थापनेपासूनच सुरू केलेली व इयत्ता दहावीला बसणाऱ्या मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना अत्यंत उपयुक्त ठरेल अशी ही व्याख्यानमाला यंदाच्या एकोणिसाव्या वर्षी सातत्याने 'प्रबोधन'ने १३ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी दरम्यान पाटकर महाविद्यालयात आयोजित केली होती. रोज सरासरी ५५० विद्यार्थ्यांची उपस्थिती या व्याख्यानमालेस लाभत होती. या व्याख्यानमालेत सर्वश्री बा. ल. नागवेकर, स. आ. पवार, इ. एस्. कुंभार, खटावकर व सौ. हडकर या तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले होते.

## वर्धापनदिन सोहळा :

'प्रबोधन' चा वर्धापन दिन सोहळा म्हणजे एक कौटुंबिक जिव्हाळ्याचा समारंभच. या सोहळ्यास संस्थेचे बहुतेक सर्व सन्माननीय सभासद सहकुटुंब उपस्थित राहून सोहळ्यास खरेखुरे कौटुंबिक समारंभाचे स्वरूप प्राप्त करून देतात. या सोहळयाच्याप्रसंगी 'बहरला पारिजात' हा मराठी वाद्यवृंदाचा कार्यक्रम संस्थेच्या सभासदांसाठी सादर करण्यात आला. त्याप्रसंगी गोरेगावातील मराठी माध्यमांच्या शाळांतून दहावी परिक्षेत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या त्याचप्रमाणे इतर विषयांत सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या गुणी विद्यार्थ्यांचा रोख पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आला. त्यासमारंभाचे प्रमुख पाहुणे प्रसिद्ध उद्योगपती श्री. कल्याणजीभाई शहा हे होते. संस्थेचे प्रमुख कार्यवाह डॉ. मनोहर अद्वानकर यानी याप्रसंगी बोलताना, प्रबोधनक्रीडा भवनाचे काम सुरू असून, ते लवकरच पूर्ण होईल, याची ग्वाही दिली.

## प्रबोधन बालवाचनालय :

शालेय विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार व्हावेत, हा दृष्टीकोन समोर ठेवून, आपल्या रचनात्मक कार्याचा एक भाग म्हणून संस्थेतर्फे गोरेगावात बालवाचनालये चालविण्यात येतात व त्याचा फायदा गोरेगावचे विद्यार्थी घेतात.

## प्रबोधन बालवाडी :

आपल्या रचनात्मक कार्याचा एक भाग म्हणून संस्थेतर्फे गोरेगावातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील मुलांसाठी या बालवाडया चालविण्यात येतात. त्यात या मुलांना मराठी माध्यमातून पूर्व प्राथमिक स्वरूपाचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्यात येते. संस्थेतर्फे अशा बालकांना जो दाखला देण्यात येतो, त्या दाखल्यावर बालकांना कोणत्याही सरकारमान्य शाळेत प्रवेश मिळू शकतो. या बालवाड्यातून शिक्षण घेतलेल्या बालकांनी त्यांच्या पुढील शैक्षणिक जीवनात चमक दाखविल्याचे दिसून आले आहे.

## धन्यवाद :

संस्थेच्या आजवरच्या आपल्या वाटचालीत अनेक मान्यवर व्यक्तिंचे, संस्थांचे त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांचे सहाय्य लाभले आहे, त्या सहाय्यामुळेच संस्थेस सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी करता आली व येथवर मजल मारता आली. त्या सर्वांचा याठिकाणी उल्लेख करणे अशक्यच आहे. संस्था त्यासर्वांची अत्यंत ऋणी आहे. संस्थेच्या यापुढील दमदार वाटचालीतही त्या सर्वांचे असेच सक्रीय सहकार्य लाभेल व संस्थेवर सर्वांचा लोभ व प्रेम तसेच कायम राहिल असा आम्हांस विश्वास वाटतो.

आपले नम्र,
कार्यकारी मंडळ (१९९०–९१)
प्रबोधन गोरेगाव

# प्रबोधन गोरेगाव

संस्था नोदणी कायदा १८६० अन्वये नोंदलेली संस्था [Regn. No. Bom. 46/72 GB BSD]
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदलेली संस्था [Regn No. F 2502 Bom.]

१९९० – ९१


अध्यक्ष : **श्री. निळकंठ ज. सावंत**
उपाध्यक्ष : **श्री. प्रभाकर मोडक** *डी.एम्.इ., डी.इ.इ.*
**श्री. विजय नाडकर्णी** *बी.ई. (ऑ.) सिव्हील*

**कार्यकारी मंडळ**

कार्याध्यक्ष : **श्री. गिरीश देसाई** *डी.सी.ई.*
प्रमुख कार्यवाह : **डॉ. मनोहर अदवानकर** *एम्.एस्सी. पी. एच्. डी.*
सहकार्यावाह : **श्री. सुरेश चव्हाण** *बी.ए.*
**श्री. श्रीनिवास शिरसेकर** *जी.डी. आर्ट*
खजिनदार : **श्री. महादेव खानोलकर**

**सभासद**

**श्री. सुभाष देसाई,** *आमदार*
**श्री. वसंत तावडे** *बी.ए.*
**श्री. दिनकर मालवणकर**
**श्री. पद्माकर देसाई** *बी.एस्सी. (ऑ)*
**श्री. विलास देवरुखकर** *बी.एस्सी. (ऑ)*
**श्री. सुरेश सैतवडेकर**
**श्री. दिलीप साळवी** *बी. एस्सी. (ऑ.)*
**श्री. विकास रेळे** *बी.ए. एल्एल्.बी.*
**श्री. नितीन शिंदे**
**श्री. चंद्रकांत पोतदार**
**श्री. चंद्रकांत देऊलकर**

**सनदी लेखापाल**
मे. एस. एस. नायक आणि कं.



*कार्यालय :*
प्रबोधन क्रीडाभवन
सिद्धार्थ नगर, गोरेगाव (प.),
मुंबई ४०० १०४.
दूरध्वनी : ६७३ ४८ ६९